दै. लोकमत, मंगळवार, दिनांक 8 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम : आत्मसंरक्षणासह कायद्याच्या ज्ञानाने होणार सक्षम

# दीड लाख विद्यार्थिनी बनणार 'निर्भय'

संतोष मिठारी • कोल्हापूर

विविध अत्याचारांच्या प्रकारांमुळे मुली मानसिकदृष्ट्या खचत आहेत. त्यांना आत्मसंरक्षणासह कायदेविषयक तरतुदी, आदी स्वरुपातील माहिती देऊन सक्षम करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने निर्भय कन्या अभियान हाती घेतले आहे. याअंतर्गत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सुमारे दीड लाख विद्यार्थिनींना ज्यूदो, कराटेच्या माध्यमातून आत्मसंरक्षणाचे धडे दिले जाणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंतीचे औचित्य साधून विद्यापीठाने महिला सक्षमीकरणासाठी हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत (एनएसएस) अभियान राबविले जाणार आहे. याअंतर्गत विद्यापीठ परिसरातील विविध अधिविभागांमधील एक हजार ९०० आणि कोल्हापूर, सांगली व सातारा या कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांतील सुमारे दीड लाख विद्यार्थिनींना निर्भय बनविले जाईल. त्यांना कराटे-कुंग फू, लाठी-काठी, योगा, प्राणायाम यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच महिलांबाबत संविधानामधील कायदेविषयक तरतुदी, लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याविषयी माहिती देणार आहेत.

### महिला सक्षमीकरणाला हातभार

निर्भय कन्या अभियानाची संकल्पना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी मांडली. त्यानुसार एनएसएस व विद्यार्थी कल्याण मंडळाच्या माध्यमातून हे अभियान राबविले जात असल्याचे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांनी सांगितले. ते म्हणाले, या अभियानातून विद्यार्थिनींना शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न आहे. जून-जुलैपासून अभियानाची व्याप्ती वाढविण्यात येईल. प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थिनी आपल्या गाव, शहरातील अन्य मुली, विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतील. त्यातून महिला सक्षमीकरणाला हातभार लागणार आहे.




### असे राबविणार अभियान

विद्यापीठात २६ फेब्रुवारीला या अभियानाची सुरुवात झाली. यात पहिल्या टप्प्यात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांमधील १२५ विद्यार्थिनींचे सहा दिवसांचे निवासी प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. यात त्यांना आत्मसंरक्षणासह कायदेविषयक तरतुदींची माहिती तज्ज्ञांच्या माध्यमातून देण्यात आली. प्रशिक्षण घेतलेल्या संबंधित विद्यार्थिनी आपआपल्या महाविद्यालयांतील कमीत कमी एक आणि जास्तीत जास्त दहा विद्यार्थिनींना प्रशिक्षण देऊन निर्भय बनविणार आहेत. वर्षभरात प्रत्येक महाविद्यालयात या अभियानाअंतर्गत प्रशिक्षण शिबिर घेण्यात येणार आहे.

दै. पुढारी मंगळवार, दिनांक - 8 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनात उल्लेखनीय यश



डॉ. ज्योती जाधव

करवीर तालुक्यातील स्वयंभूवाडी (सांगरूळ) येथे डॉ. ज्योती प्रफुल्ल जाधव यांचा एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म झाला. कष्ट व बुद्धीच्या जोरावर सध्या त्या शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. संशोधनामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधन करणाऱ्या नामांकित महिलांमध्ये त्यांचा समावेश झाला आहे. मात्र, त्यांचा इथंवर पोहोचण्याचा प्रवास हा तितका सोपा व सहज नक्कीच नव्हता.

डॉ. जाधव यांनी जीवरसायनशास्त्र यासारख्या कठीण विषयातील उच्च शिक्षण नॅशनल मेरिट स्कॉलरशिप मिळवत विशेष प्रावीण्यासह पूर्ण केले. राज्य पातळीवरची गेट परीक्षा ९९.३८ टक्के गुणांनी त्या उत्तीर्ण झाल्या. आय. आय. टी. पवईसारख्या राष्ट्रीय संस्थेमध्ये संधी असताना ही, शिवाजी विद्यापीठामध्ये पीएच. डी. करण्याचा निर्णय घेऊन त्यांनी आपल्या संशोधन कार्यास सुरुवात केली. त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेऊन अलीकडेच बायोटेक रिसर्च सोसायटी ऑफ इंडियातर्फे पुरस्कार प्रदान करण्यात आला. १०२ आंतरराष्ट्रीय नियकालिकांमध्ये त्यांचे संशोधन पेपर प्रसिद्ध आहेत तसेच १५० आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये पेपर सादर केले आहेत. विविध शैक्षणिक समित्यांवर सदस्य म्हणून कार्यरत आहेत. गुळाची पावडर, गुळाच्या प्रक्रिया, एक्स्पोर्ट क्वॉलिटी, गुळनिर्मिती यावरही त्यांचे संशोधन सुरू आहे. विद्यापीठात नवनवीन तंत्रज्ञात विकसित करण्याचा त्यांचा मानस आहे, समाजोपयोगी संशोधनावरही त्यांचा भर आहे.

---



लहानपणीच आईचे छत्र हरवले...वडील ट्रक ड्रायव्हर... राहायला स्वत:चे घर नाही... अशा परिस्थितीत बारावीपासून ते पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण कोचिंग क्लास घेऊन व 'मागेल त्याला काम' योजनेतून पूर्ण करीत शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली. शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभागातील शबाना गैबी हळंगळी या विद्यार्थिनीचा खडतर व

## 'तिच्या' जिद्दीला सलाम

आदर्श असा यशस्वी शैक्षणिक प्रवास. शबानाचे वडील मालवाहतूक ट्रक ड्रायव्हर आहेत. मोठी बहीण व वडिलांनी तिचा सांभाळ केला. १ ली ते ९ वीपर्यंतचे खासगी क्लास घेऊन पदवीचे शिक्षण घेतले. एम.ए.ला विद्यापीठातील 'मागेल त्याला काम' योजनेंतर्गत काम केले. 'शहाबानो खटल्याच्या निकालाचे राजकारण व मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न' या विषयावर एम.फिल. केले. २०१२ ला पीएच. डी.ला प्रवेश घेतला. संशोधनकाळात १८ संशोधनपर लेख प्रसिद्ध केले. २०१६ ला 'मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा स्त्री सुधारणाविषयक कार्याचा अभ्यास' या विषयावर पीएच.डी. पदवी मिळविली.

- प्रवीण मस्के

दै. सकाळ मंगळवार, दिनांक 8 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लढाई परीक्षेची, वेळ अभ्यासाची!

कोल्हापूर : परीक्षा म्हणजे आयुष्यातील एक लढाई. ती जिंकायची असेल, तर अभ्यास हवाच. मार्च-एप्रिल म्हणजे परीक्षांचा काळ. या परीक्षेत यशस्वी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी-विद्यार्थिनींची गर्दी होऊ लागली आहे. विविध अधिविभाग, ग्रंथालय व अभ्यासिका तसेच बागेत एकत्रित अभ्यास केला जात आहे.

(संजय देसाई : सकाळ छायाचित्रसेवा)













दै. तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मंगळवार, दिनांक - 8 MAR 2016

# शिक्षण हे मानवाला श्वासाइतकेच महत्त्वाचे

इचलकरंजी : समाजाच्या प्रत्येक व्यक्तीचे मन, मनगट आणि मेंदू बळकट करुन, सामर्थ्य निर्माण करण्यासाठी मानवाच्या श्वासाइतके शिक्षण महत्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. नाईट कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्समध्ये आयोजित कै. बाबासाहेब खंजिरे, कै. सरोजिनी खंजिरे, कै. प्रकाश खंजिरे यांच्या संयुक्त स्मृतीदिन कार्यक्रमामध्ये बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे होते.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन**

व्यासपीठावर संस्थाध्यक्ष अरुण खंजिरे, श्रीमती अरुंधती खंजिरे, उपाध्यक्ष बाळासाहेब मुरदंडे, खजिनदार प्रदीप गोलंगडे, शेखर पाटील, शशांक बावचकर, शंकरराव आदर्श, डॉ. सी. डी. पाटील, प्राचार्य डॉ. पी. डी. नाळे उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, सध्याच्या तरुणांमध्ये सहनशक्ती कमी होत चालली आहे. ध्येयप्राप्तीच्या मार्गात अनेक अडथळे आले तरी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. उघड्या डोळ्यांनी स्वप्ने पहा कारण अशा स्वप्नांना विवेकाची जोड असते. यश मिळाले तर हुरळून जाऊ नये याउलट अपयशामुळे नाराजी नको. सातत्याने स्वतःवर प्रयोग करुन स्वतःला परिस्थितीसापेक्ष बदलत जाणे यशासाठी महत्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी योग्य ध्येय निश्चित करुन प्रयत्नशील रहावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

दै. पुण्य नगरी मंगळवार, दिनांक - 8 MAR 2016

# सामर्थ्य निर्माण करण्यासाठी शिक्षण महत्वाचे : डॉ. देवानंद शिंदे

इचलकरंजी / प्रतिनिधी

समाजाच्या प्रत्येक व्यक्तीचे मन, मनगट आणि मेंदु बळकट करुन सामर्थ्य निर्माण करण्यासाठी मानवाच्या श्वासाइतकेच शिक्षण महत्वाचे असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. येथील दे.भ.बाबासाहेब खंजिरे शिक्षण संस्थेच्या नाईट कॉलेज ऑफ आर्टस अँण्ड कॉमर्समध्ये आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी खा.कल्लाप्पाण्णा आवाडे होते.

कुलगुरु डॉ.शिंदे म्हणाले, सध्याच्या तरुणांमध्ये सहनशक्ती कमी होत चालली आहे. ध्येय प्राप्तीच्या मार्गात अनेक अडथळे आले तरी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. उघड्या डोळ्यांनी स्वप्ने पहा, कारण अशा स्वप्नांना विवेकाची जोड असते. यश मिळाले तर हुरळून जावू नये आणि अपयशाची नाराजी नको. सातत्याने स्वतःवर प्रयोग करुन स्वतःला परिस्थिती सापेक्ष बदलत जाणे यशाकरीता महत्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिवनाच्या कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्याकरीता ध्येय निश्चित करुन प्रयत्नशिल रहावे, असेही त्यांनी सांगितले. नाईट कॉलेजचे तिसऱ्यांदा नॅककडून मुल्यांकन झाल्याबद्दल प्रशासन व शिक्षकांचे त्यांनी अभिनंदन केले. माजी खा.कल्लाप्पाण्णा आवाडे यांनी सध्याच्या काळात बाबासाहेबांचा विचार केंद्रबिंदू मानून कार्य करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन केले.

स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य पी. डी.नाळे यांनी केले. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष अरुणराव खंजिरे, अरुंधती खंजिरे, बाळासाहेब मुरदंडे, प्रदीप गोलंगडे, शेखर पाटील, शशांक बावचकर, शंकरराव आदर्श, डॉ.सी.डी.पाटील उपस्थित होते. प्रा.एम. आर.दांडेकर यांनी सुत्रसंचालन, आभार अरुण खंजिरे यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
The Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Tuesday 8 MAR 2016

# 125 colleges to host lectures on Ambedkar from March 11

**Kolhapur:** On the occasion of 125th birth anniversary of Dr Babasaheb Ambedkar, the Shivaji University, Kolhapur (SUK) will pay tribute in a unique way. The university has arranged as many as 125 lectures, each in 125 colleges. Each lecture will try to focus on different aspects of Ambedkar's life.

According to the SUK officials, this event will be conducted on March 11 across selected colleges in Sangli, Satara and Kolhapur districts. The preparations regarding the same have already been done, a university official said.

Devanand Shinde, SUK vice-chancellor said that this will be a tribute to Ambedkar and that university is proud to organise such event.

A SUK official said that since the summer exams this year are beginning early in mid-March, it will not be possible for students or colleges to arrange any event on April 14, the birth anniversary of Ambedkar. So, the lecture series is being conducted a month earlier in all colleges, so that the students can attend the event.

Instructions regarding the lecture have already been passed on and experts who will deliver the lecture will make sure that all aspects of Ambedkar's life are covered so that it remains new for students, the official added.

As the university will be compiling the lectures, one hard copy along with the lecturer's photograph will also be collated so that it will be used as proper reference, the official added. TNN